Report

Title: Guidance to MPSC and UPSC Examination preparation

Date: 04/05/2022

The workshop on MPSC and UPSC examination preparation is conducted by department of Geography for student of college. Miss Trupti Dhodmise, Additional Collector ,Dhule was the Chief Guest and speaker for the workshop.

सकाळ

# योग्य नियोजनातून स्पर्धा परीक्षेत यश

## तृप्ती धोडमिसे : घोगरे विज्ञान महाविद्यालयात तयारीवर व्याख्यान

सकाळ वृत्तसेवा

धुळे, ता. ४ : स्पर्धा परीक्षेसाठी अभ्यासाचे योग्य नियोजन करणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी स्मार्ट वर्कवर जोर दिला पाहिजे. अपयश आले तरी खचून न जाता प्रयत्न सोडू नये. जिद्द व इच्छाशक्तीच्या बळावर यशाला गवसणी घालता येईल, असे प्रतिपादन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रांताधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी केले.

येथील श्री शिवाजी विद्याप्रसारक संस्थेच्या डॉ. पा. रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयात भूगोल विभागातर्फे सहाय्यक जिल्हाधिकारी धोडमिसे यांचे स्पर्धा परीक्षेचे आकर्षण आणि वास्तव या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी स्पर्धा परीक्षेचे स्वरूप आणि तयारी कशी करावी याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील, उपप्राचार्य प्रा. के. एम. बोरसे, प्रा. [illegible] आर. ए. मोरे, प्रा. डि. एस. ठाकरे, प्रा. प्रेमराज पाटील, प्रा. विजय पाटील, प्रा. विक्रम अहिरे आदी उपस्थित होते. श्रीमती धोडमिसे म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी सकारात्मक मानसिकता ठेवावी. वाचन, संयमाला अनुसरून तयारी केल्यास यश नक्की मिळते. अनेक विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे आकर्षण असते. परंतु, त्यातील जे विद्यार्थी योग्य प्रकारे तयारी करतात, तेच यशस्वी होतात. कोणतीही स्पर्धा परीक्षा देताना सखोल मोठे आव्हान आपली इच्छाशक्ती असते. अभ्यास म्हणजे फक्त पुस्तक वाचन नाही, तर स्पर्धा परीक्षा देताना अभ्यासाचे योग्य नियोजनही निश्चित महत्त्वाचे आहे. स्मार्ट वर्क करा. अपयश आले तरी खचून जाऊ नये. मिळालेल्या यशामुळे हुरळून न जाता पुन्हा जिद्दीने उभे राहून कष्ट करण्याची तयारी असेल तर स्पर्धा परीक्षेत यश मिळणे अवघड नाही, असेही श्रीमती धोडमिसे यांनी सांगितले. विद्यार्थी गायत्री अहिरराव, धनंजय विजय चौधरी, हर्षिक पाटील, समाधान पाटील, स्वप्नील राणे, योगेश शिरसाठ, भूषण माळी आदींनी संयोजन केले.



धुळे : घोगरे विज्ञान महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेवर बोलताना तृप्ती धोडमिसे. शेजारी डॉ. एम. व्ही. पाटील, प्रा. के. एम. बोरसे आदी.

PRINCIPAL
S.S.V.P.Sanstha's Late Karmveer
Dr.P.R.Ghogrey Science College
Dhule.

# Report

Title: Guidance to MPSC and UPSC Examination preparation

Date: 27/01/2020

The workshop on MPSC and UPSC examination preparation is conducted by department of Geography for student of college. Mr. Sumit Salunkhe Branch Manager, Unique Academy, Dhule was the chief guest and speaker for the workshop on the occasion of Geography day.



PRINCIPAL
S.S.V.P.Sanstha's Late Karmveer
Dr.P.R.Ghogrey Science College
Dhule.